**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. १५९/२०१९</u>** **निशानी २९ च्या पुढे**

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे श्री. एस. एम. नवले अधिवक्ता</u>**

वाद मिळकत माझे आईचे नावाने आहे. वाद मिळकतीचे पश्चिमेस प्रतिवादीची मिळकत आहे. मी निशाणी २४ व २५ अन्वये नगरपरिषद सिन्नर यांना तक्रारी अर्ज दिले होते. मी दिलेल्या तक्रारी अर्जावर नगरपरिषदेने कोणतीही दखल घेतलेली नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास श्री. जी. सी. बर्के अधिवक्ता</u>**

हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र मी न वाचता सही केली. मी नगरपरिषदेला अर्ज देण्यापुर्वी आईचे कुलमुखत्यार पत्र घेतले नव्हते. साक्षीदार सांगतो की, मी आणि आई सोबतच गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी नगरपरिषदेने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने अतिक्रमण केले नाही म्हणून नगरपरिषदेने माझे तक्रारी अर्जाची दखल घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी शेजारी असून त्यांनी चांगले घर बांधले म्हणून मी चुकीच्या भावनेने चुकीचा दावा दाखल केलेला आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष

सही/—XXX
**(श्री. लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सिन्नर.

दि. २५.०८.२०२५